< अर्थसंकल्पिय अनुदान सन २०१८-२०१९
"२२१५ पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१) (०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)"
मागणी क्रमांक वाय -२ >

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः बजेट-१४१८/प्र.क्र.११५/पापु-२३

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख : २० एप्रिल, २०१८

वाचा :-

शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल,२०१८

प्रस्तावना :-

सन २०१८-२०१९ चा अर्थसंकल्प विधानमंडळास सादर करण्यात आला असून विधानमंडळाने महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१८ मंजूर केले आहे. सदर विधेयकास महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी अधिसंमती दिली असून ते २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-२२ म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक २७ मार्च, २०१८ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. तसेच सन २०१८-२०१९ या वर्षाच्या प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०१८ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ७० टक्केच्या मर्यादेत अर्थसंकल्पीय प्रणालीवर वित्त विभागाने संदर्भाधीन परिपत्रकान्वये वितरीत केला आहे.

२. जिल्हा परिषदेमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या आस्थापनेवरील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांचे वेतन व वेतनेतर खर्च भागविण्यासाठी मागणी क्रमांक वाय-२ "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)" या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष सन २०१८-२०१९ करिता ०१, वेतन साठी रुपये ३३,४६,७६,०००/-(अक्षरी रुपये तेहत्तीस कोटी

सेहेचाळीस लाख श्याहत्तर हजार फक्त) व ११, देशांतर्गत प्रवास खर्चासाठी रुपये १,१२,१७,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी बारा लाख सतरा हजार फक्त) अशी एकूण रुपये ३४,५८,९३,०००/- (अक्षरी रुपये चौतीस कोटी अठ्ठावन्न लाख त्र्याण्णव हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे.

३. आता वित्त विभागाने उपरोक्त परिपत्रकान्वये सन २०१८-२०१९ करीता सदर तरतूदीपैकी ७० % निधी अर्थसंकल्पीय प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यास अनुसरुन सन २०१७-२०१८ मध्ये संबंधित जिल्हा परिषदांनी उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत केलेला प्रत्यक्ष खर्च विचारात घेऊन माहे एप्रिल,२०१८ ते जून, २०१८ या तीन महिन्यांकरीता निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षासाठी “२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)” या लेखाशिर्षाखाली जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या आस्थापनेवरील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांचे ०१, वेतन व ११, देशांतर्गत प्रवास खर्च भागविण्यासाठी या शासन निर्णयासोबतच्या “विवरणपत्र अ” मधील स्तंभ ५ मध्ये दर्शविल्यानुसार आता एकूण अनुदान रुपये ६,४९,४८,०००/- (अक्षरी रुपये सहा कोटी एकोणपन्नास लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त) संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना मंजूर करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेले अनुदान शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहील. या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र अ मधील स्तंभ क्रमांक ५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या रकमांपेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर निधी ज्या प्रयोजनासाठी आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च होईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

३. सदर शासन निर्णयान्वये तसेच यापूर्वी वितरित केलेल्या निधीची उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर केल्याची खात्री करुनच पुढील आवश्यक निधीची मागणी करण्याची दक्षता घेण्यात यावी. पुढील मागणीपत्र प्राप्त झाल्याशिवाय निधी वितरीत केला जाणार नाही याची संबंधित जिल्हा परिषदांनी नोंद घ्यावी. शासनाद्वारे देण्यात येणारे वेतन अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये ECS द्वारे प्रदान करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत वेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरित्या व Offline पद्धतीने वितरीत करण्यात येऊ नये.

४. या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून होणारा खर्च मागणी क्रमांक वाय-२ "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१) (०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)" ०१, वेतन व ११, देशांतर्गत प्रवास खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१७ अन्वये विभागांना दिलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहेत. या परिपत्रकान्वये नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता होत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१३१४३२०८६०२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Balasaheb B Hajare

Digitally signed by Balasaheb B Hajare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49ad4eefa4101394c1b1119b5f2d93940a592bd8a91d2970b24702e05968e19f, cn=Balasaheb B Hajare
Date: 2018.04.20 11:28:43 +05'30'

बाळासाहेब बा. हजारे
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विधानसभा / विधान परिषद, सर्व
२. विभागीय आयुक्त,

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
५. संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे
६. सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
७. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
८. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
९. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सर्व
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
११. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, सर्व
१४. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१५. वित्त विभाग, (व्यय-३ व अर्थ-१९)
१६. कार्यासन क्रमांक पापु-०४ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१७. ग्राम विकास व जलसंधारण विभाग
१८. निवड नस्ती कार्यासन पापु-२३

विवरणपत्र-अ

शासन निर्णय क्रमांक बजेट-१४१८/प्र.क्र.११५/पापु-२३, दिनांक २० एप्रिल, २०१८ सोबतचे सहपत्र

मागणी क्रमांक वाय-२ "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)"					
अ. क्र.	जिल्ह्याचे नांव	सन २०१८-२०१९ करीता या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेले अनुदान			या शासन निर्णयान्वये लेखाशीर्ष २२१५ १८४३ खाली वितरीत करण्यात येत असलेली एकूण रक्कम (अक्षरी रुपये)
		वेतन	देशांतर्गत प्रवास खर्च	वितरीत करण्यात येत असलेली एकूण रक्कम (३+४)	
१	२	३	४	५	६
१	ठाणे	१४०००००	२०००	१४०२०००	रूपये चौदा लाख दोन हजार फक्त
२	पालघर	१००००००	०	१००००००	रूपये दहा लाख फक्त
३	रायगड	१८०००००	०	१८०००००	रूपये अठरा लाख फक्त
४	रत्नागिरी	१८०००००	२९०००	१८२९०००	रूपये अठरा लाख एकोणतीस हजार फक्त
५	सिंधुदुर्ग	१००००००	३००००	१०३००००	रूपये दहा लाख तीस हजार फक्त
६	नाशिक	१६०००००	०	१६०००००	रूपये सोळा लाख फक्त
७	धुळे	१८०००००	५०००	१८०५०००	रूपये अठरा लाख पाच हजार फक्त
८	नंदुरबार	२००००००	२७०००	२०२७०००	रूपये वीस लाख सत्तावीस हजार फक्त
९	जळगांव	२२०००००	३८०००	२२३८०००	रूपये बावीस लाख अडतीस हजार फक्त
१०	अहमदनगर	२००००००	०	२००००००	रूपये वीस लाख फक्त
११	पुणे	३००००००	१२०००	३०१२०००	रूपये तीस लाख बारा हजार फक्त
१२	सातारा	२९०००००	४६०००	२९४६०००	रूपये एकोणतीस लाख सेहेचाळीस हजार फक्त
१३	सांगली	१२०००००	४०००	१२०४०००	रूपये बारा लाख चार हजार फक्त
१४	सोलापूर	२२०००००	२१०००	२२२१०००	रूपये बावीस लाख एकवीस हजार फक्त
१५	कोल्हापूर	२७०००००	०	२७०००००	रूपये सत्तावीस लाख फक्त
१६	औरंगाबाद	२४०००००	८०००	२४०८०००	रूपये चोवीस लाख आठ हजार फक्त
१७	जालना	२४०००००	०	२४०००००	रूपये चोवीस लाख फक्त
१८	परभणी	१६०००००	५०००	१६०५०००	रूपये सोळा लाख पाच हजार फक्त
१९	हिंगोली	७०००००	०	७०००००	रूपये सात लाख फक्त
२०	बीड	१००००००	३०००	१००३०००	रूपये दहा लाख तीन हजार फक्त
२१	नांदेड	२६०००००	०	२६०००००	रूपये सव्वीस लाख फक्त
२२	उस्मानाबाद	२००००००	२४०००	२०२४०००	रूपये वीस लाख चोवीस हजार फक्त
२३	लातूर	२७०००००	३१०००	२७३१०००	रूपये सत्तावीस लाख एकतीस हजार फक्त
२४	बुलढाणा	१८०००००	२५०००	१८२५०००	रूपये अठरा लाख पंचवीस हजार फक्त
२५	अकोला	१३०००००	०	१३०००००	रूपये तेरा लाख फक्त
२६	वाशिम	१४०००००	४०००	१४०४०००	रूपये चौदा लाख चार हजार फक्त
२७	अमरावती	२५०००००	३४०००	२५३४०००	रूपये पंचवीस लाख चौतीस हजार फक्त
२८	यवतमाळ	२३०००००	१५०००	२३१५०००	रूपये तेवीस लाख पंधरा हजार फक्त
२९	वर्धा	१८०००००	१२०००	१८१२०००	रूपये अठरा लाख बारा हजार फक्त
३०	नागपूर	२१०००००	४०००	२१०४०००	रूपये एकवीस लाख चार हजार फक्त
३१	भंडारा	२३०००००	२८०००	२३२८०००	रूपये तेवीस लाख अठ्ठावीस हजार फक्त
३२	गोंदिया	१७०००००	८०००	१७०८०००	रूपये सतरा लाख आठ हजार फक्त
३३	चंद्रपूर	१५०००००	११०००	१५११०००	रूपये पंधरा लाख अकरा हजार फक्त
३४	गडचिरोली	१८०००००	२२०००	१८२२०००	रूपये अठरा लाख बावीस हजार फक्त
एकूण		६४५००००००	४४८०००	६४९४८०००	रूपये सहा कोटी एकोणपन्नास लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त

Balasaheb B Hajare

Digitally signed by Balasaheb B Hajare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49ad4eefa4101394c1b1119b5f2d93940a592bd8a91d2970b24702e05968e19f, cn=Balasaheb B Hajare
Date: 2018.04.20 11:29:10 +05'30'

(बाळासाहेब बा. हजारे)

कायोसन आधिकारी , महाराष्ट्र शासन